सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
## सहाय्यक संचालक ( पुरातत्व )
## विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर विभाग

सोनेरी महाल, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसर, छत्रपती संभाजीनगर - ४३१ ००४.
दुरध्वनी क्रमांक : ०२४० - २४०० २६९
Email Id : ada.aurangabad@gmail.com

क्रमांक : आस्था/लिलाव-वाहन/२०२५/ 329    दिनांक : 2.7 FEB 2025

**निविदा**

सहायक संचालक (पुरातत्व) विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील खालील नमूद निर्लेखित वाहनाची निविदा प्रक्रियेद्वारे (आहे तशीच व आहे तेथेच या तत्वावर) निर्गती करणेकामी इच्छुक व्यक्ती / नोंदणीकृत संस्थांकडून सीलबंद निविदा मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | वाहन क्रमांक | वाहनाचा प्रकार | अपसेट प्राईस रु. |
|---|---|---|---|
| १ | एम.एच.२०- ई-२३७३ | आरमाडा जीप (सन १९९७ मॉडेल) | रु. ३५,०००/- |

सदर निविदा दिनांक ०३/०३/२०२५ ते १७/०३/२०२५ या कालावधीत सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग महाराष्ट्र शासन, सोनेरी महल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसर, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयात कार्यालयीन वेळेत सादर करणे आवश्यक आहे.

१) लिलावसंबंधीचा फॉर्म, अटी व शर्ती इ. अस्थापना शाखा, सहायक संचालक (पुरातत्व) विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे दि. ०३/०३/२०२५ ते १३/०३/२०२५ या कालावधीत कार्यालयीन वेळेत उपलब्ध होतील.

२) कोणत्याही परिस्थितीत दि. १७/०३/२०२४ रोजी कार्यालयीन वेळेनंतर प्राप्त झालेल्या निविदा सूचना स्विकारल्या जाणार नाहीत.

३) ज्यांनी निविदा भरल्या आहेत त्या निविदाधारकानांच वाहनाच्या निविरा प्रक्रियेत भाग घेता येईल.

४) प्राप्त झालेल्या निविदा दिनांक १८/०३/२०२५ रोजी दुपारी ३.०० वाजता निविदाकाराच्या /निविदाकाराच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधीसमोर व ते हजर नसल्यास, त्यांच्या गैरहजेरीत उघडण्यात येतील. अनामत रक्कमेशिवाय आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. कोणतेही कारण न देता एखादी अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग महाराष्ट्र शासन, औरंगाबाद यांचेकडे राखून ठेवण्यात आला आहे

५) निविदेतील दरापैकी जे दर सर्वात जास्त असतील त्या सर्वोच्च रक्कमेची निविदा / मंजूर करण्यात येईल.

६) सदरचे वाहन पाहण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय जळगाव येथे उपलब्ध आहे.

(जया वि. वाहणे)
सहाय्यक संचालक ( पुरातत्व )
छत्रपती संभाजीनगर विभाग

प्रत माहितीस्तव अग्रेषित:-

१) वरीष्ठ कोषागार अधिकारी, कोषागार कार्यालय, छत्रपती संभाजीनगर
२) वरीष्ठ लेखा लिपिक, पुरातत्व विभाग, छत्रपती संभाजीनगर
३) निवडनस्ती (आस्था)

Scanned with OKEN Scanner

## सहाय्यक संचालक ( पुरातत्व )
## विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर विभाग

### निविदेच्या अटी व शर्ती

१) सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग, महाराष्ट्र शासन, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयातील आरमाडा जीप वाहन **क्र.एम.एच.२०- ई-२३७३ (आरमाडा जीप) (सन १९९७ मॉडेल)** जसे आहे, जेथे आहे, त्या स्थितीत विकणे आहे. यासाठी विहित नमुन्यात मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

२) मोहरबंद पाकिटात निविदा **दिनांक ०३/०३/२०२५ ते १७/०३/२०२५** या कालावधीत सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग महाराष्ट्र शासन, सोनेरी महल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसर, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयात कार्यालयीन वेळेत सादर करणे आवश्यक आहे.

३) सदर वाहन सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग महाराष्ट्र शासन, सोनेरी महल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ परिसर, छत्रपती संभाजीनगर या पत्त्यावर इच्छुकांना कार्यालयीन वेळेत पाहता येईल.

४) सिलबंद पाकिटामध्ये वाहनाची किंमत नमूद केलेले पत्र एका पाकिटामध्ये टाकण्यात यावे. सिलबंद पाकिटावर निलेखित वाहनसाठी निविदा असा उल्लेख करावा.

५) निविदेत भाग घेण्यासाठी ना-परतावा असलेली रु. ५००/- (अक्षरी रुपये पाचशे फक्त) इतकी निविदा फीस रोखीने कार्यालयाच्या लेखा शाखेत जमा करणे आवश्यक आहे.

६) मोहरबंद निविदा सोबत अनामत रक्कम रुपये ५,०००/- (अक्षरी रुपये पाच हजार रुपये) जमा करणे आवश्यक आहे.

७) निविदा सादर करातांना निविदाधारकाने वाहनाची पूर्ण पाहणी केली आहे, असे गृहित धरण्यात येईल. नंतर कोणतीही तक्रार स्विकारली जाणार नाही.

८) प्राप्त झालेल्या निविदा **दिनांक १८/०३/२०२५** रोजी दुपारी ३.०० वाजता निविदाकाराच्या /निविदाकाराच्या प्रतिनिधीच्या उपस्थितीत किंवा त्यांच्या अधिकृत प्रतिनिधीसमोर व ते हजर नसल्यास, त्यांच्या गैरहजेरीत उघडण्यात येतील. अनामत रक्कमेशिवाय आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. कोणतेही कारण न देता एखादी अथवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग महाराष्ट्र शासन, छत्रपती संभाजीनगर यांचेकडे राखून ठेवण्यात आला आहे.

९) निवड न झालेल्या दरपत्रकधारकास इसारा (EMD) रक्कम परत करण्यात येईल.

१०) वरील वाहन विहित अटी व शर्ती पुर्ण करण्याऱ्या तसेच उच्चतम दर असलेल्या निविदाधारकाची निवड करण्यात येईल. सदर पात्र निविदाधारकास निविदा मंजुरीनंतर उर्वरित रक्कम त्वरीत कार्यालयात जमा/भरावी लागेल. निविदाधारकाने उर्वरित रक्कम भरण्यास असमर्थता दर्शविली किंवा निविदा उघडल्यानंतर निविदा प्रक्रियेतून माघार घेण्यात आली तर त्यांची अनामत/इसारा (EMD) रक्कम जप्त करण्यात येईल.

११) यशस्वी उच्चतम निविदेधारकांनी संपूर्ण रकमेच्या भरणा केल्यानंतर, संबंधित वाहन ३० दिवसाच्या आत कार्यालयीन दिवशी व कार्यालयीन वेळेत ताब्यात घेणे बंधनकारक राहील.

१२) विहित कालावधीत सदर वाहन ताब्यात न घेतल्यास प्रतिदिन रु. १००/- प्रमाणे दंड आकारणी करण्यात येईल. भरणा केलेली अनामत/ इसारा (EMD) रक्कम जप्त करण्यात येईल. त्यासाठी कोणतेही कारण / तक्रार करता येणार नाही व सदर यशस्वी निविदा रद्द करण्याचा अधिकार सहायक संचालक, पुरातत्व विभाग, महाराष्ट्र शासन, छत्रपती संभाजीनगर यांना राहील.

१३) वाहन ताब्यात घेतल्यानंतर निविदाधारकाने वाहन प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडुन नावावर करुन घेण्याची जबाबदारी संबंधित निविदाधारकाची असेल. वाहन ताब्यात आल्यानंतरची पुर्णतः जबाबदारी संबंधित निविदाधारकाची असेल.

१४) निविदेमध्ये भरलेल्या रक्कमेवर लागू होणारे सर्व प्रकारचे कर व इतर चार्जेस मंजूर निविदाधारकाने भरावयाचे आहेत.

१५) प्राप्त झालेल्या निविदा स्विकारणे अथवा रदद् करणे हा संपूर्ण अधिकार सहाय्यक संचालक, पुरातत्व विभाग औरंगाबाद यांचेकडे असेल. त्यासाठी कोणत्याही कारणमिमांसा देण्यात येणार नाही.

(जया वि. वाहणे)
सहाय्यक संचालक ( पुरातत्व )
छत्रपती संभाजीनगर विभाग

## दरपत्रक सादर करणेकरीता नमुना

प्रति,
सहायक संचालक (पुरातत्व) विभागीय कार्यालय,
छत्रपती संभाजीनगर,

विषय:- आरमाडा जीप वाहन क्र.एम.एच.२०- ई-२३७३ (आरमाडा जीप) च्या विक्रीसाठी निविदा सादर करणेबाबत.

| अ.क्र. | तपशील | माहिती |
|---|---|---|
| १) | निविदाधारकाचे नाव/कंपीन/फर्म असल्यास, त्यांचे नाव | |
| २) | निविदाधारकाचा पूर्ण पत्ता | |
| ३) | निविदाधारक कंपीन/फर्म असेल तर कंपनीचा पूर्ण पत्ता | |
| ४) | निविदाप्रसिद्धीनूसार वाहन पाहणी केल्याचा दिनांक | |
| ५) | इसारा (EMD) रक्कम भरल्याचा क्रमांक व दिनांक | |

आपल्या कार्यालयाकडुन प्रसिद्ध केलेली निविदा क्रमांक : आस्था/लिलाव-वाहन/२०२५/---------दिनांक : -----/०२/२०२५ नूसार व त्यामधील अटी व शर्तीनूसार सदरची दरपत्रक सादर करीत आहे. निविदेसोबतच्या नमुद अटी व शर्तीनुसार खालील नमूद केलेले वाहन त्यासमोर नमूद केलेल्या किंमतीस जसे आहे, त्या स्थितीत खरेदी करू इच्छितो. सदरचे वाहन खरेदी नंतर हस्तांतरण नोंदणीकरीता होणारा सर्व खर्च मी/आम्ही स्वखर्चाने करणार आहे/ आहेत.

वाहन क्र:...........................................................................

वाहनाचे दर:-....................................................................

उपरोक्त वाहनाच्या निविदा रकमेवर आपल्या कार्यालयाकडून आकारण्यात येणारा आवश्यक तो वस्तु व सेवा कर भरण्यास माझी संमती आहे.
निविदेमधील नमूद सर्व सूचना, अटी व शर्ती मला / आम्हाला मान्य आहेत.

आपला,

दरपत्रकधारकाचे पूर्ण नाव व सही
संपूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांक.